Chate
The Symbol of Merit

# चाटे कोचिंग क्लासेस

**मुख्य कार्यालय :** 'चाटे हाऊस' प्लॉट नं. ४, एन-२ क्रिकेट स्टेडियमजवळ, औरंगाबाद - ४३१ २१३ ☎ : २४७३००१/२

दिनांक :

प्रति,

डॉ. धनसिंग चौधरी,

संमोहन उपचार तज्ज्ञ, पुणे.

**विषय:- आपल्या संमोहन उपचार कार्यशाळेबाबत.....**

महोदय,

सध्याचे युग हे स्पर्धात्मक युग आहे. आपला व्यवसाय टिकवून ठेवण्यासाठी व तो आणखी पुढे नेण्यासाठी आपल्या हाताखालील जबाबदाऱ्यांची कामं सांभाळणारा स्टाफ व नोकरवर्गसुध्दा स्वत:लाकामात झोकून देणारा हवा. आपलं स्वत:चं समजून काम करणारा हवा. बेजबाबदारपणा, बेशिस्तपणा, अनियमितपणा, उध्दटपणा, आळस, नकारात्मक विचारसरणी, व्यसनाधीनता, निव्वळ पगारासाठी काम करणं, कामावर टाइमपास करणं,.... यासारखा अवगुणी स्टाफ / नोकरवर्ग असेल तर त्या संस्थेचं / कंपनीचे देवच भलं करो!

मागे काही वर्षांपूर्वी आम्ही आपला **'कामयाबी की ओर'** हा स्टेज शो औरंगाबादमध्ये पाहिला. आपल्या कार्यशाळेविषयी माहिती मिळवली. आपल्या कार्यशाळेचा आमचे शाखा प्रमुख, शिक्षक, स्टाफ तसेच कर्मचारीवर्गासाठी फायदा घ्यायचे ठरविले. आमच्या 'चाटे कोचिंग क्लासेस' च्या संपूर्ण महाराष्ट्राभर शाखा पसरलेल्या आहेत. आधी सर्व शाखाप्रमुखांसाठी आम्ही आपली कार्यशाळा आयोजित केली. नंतर आम्ही त्यांची मते मागविली. कार्यशाळेची सर्वांनीच चांगली प्रशंसा केली व त्यांनी सर्व शिक्षक, स्टाफ तसेच कर्मचाऱ्यांसाठीही कार्यशाळेची मागणी केली, त्यामुळे संपूर्ण महाराष्ट्रात ठिकठिकाणी आपल्या कार्यशाळेचे आम्ही आयोजन केले. सर्वांमध्ये आम्हाला अपेक्षित, सकारात्मक बदल जाणवले. अजूनही गरजेनुसार आम्ही अधूनमधून आपल्या कार्यशाळेचं आयोजन करीत असतो. आपला व्यावसाय कुठलाही असो, आपल्या अधिकाऱ्यांसाठी / स्टाफसाठी / कर्मचाऱ्यांसाठी संमोहन उपचारांच्या आपल्या कार्यशाळेचा लाभ घेतल्यास व्यवसायवृध्दी निश्चितच होते असा आमचा ठाम विश्वास आहे.

मुळात ज्या संस्थेत / कंपनीत सर्वच कर्मचारी, स्टाफ अगदी व्यवस्थित आहे, अशा ठिकाणीसुध्दा त्यांची कार्यक्षमता आणखी वाढविण्यासाठी आपली कार्यशाळा लाभदायी ठरेल यात शंकाच नाही. आपल्या या सत्कार्यास हार्दिक शुभेच्छा!

धन्यवाद!

आपला

CHATE COACHING CLASSES PVT.LTD.
"Chate House", Plot No.04,
Near Cricket Stadium,N-2,CIDCO,A'bad